# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
## कोल्हापूर विभागीय मंडळ, राजेंद्रनगर, कोल्हापूर - ४

क्र.कोविमं/उ.मा./परीक्षा/ 1921
दिनांक: २२/१०/२०१८

प्रति,
प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त क.महाविद्यालये,(सातारा,सांगली,कोल्हापूर.)

विषय: **फेब्रु.-मार्च २०१९ मध्ये घेण्यात येणा-या उच्च माध्यमिक (१२ वी) प्रमाणपत्र परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन सादर करणेसाठी मुदतवाढीबाबत..**

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, फेब्रु.-मार्च २०१९ मध्ये घेण्यात येणा-या उच्च माध्यमिक (१२ वी) प्रमाणपत्र परीक्षेची नियमीत,पुनर्परिक्षार्थी,नांव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी तसेच श्रेणी सुधार योजनेअंतर्गत व तुरळक विषय घेवून परीक्षेस प्रविष्ठ होणा-या विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने www.mahahsscboard.maharashtra.gov.in किंवा www.mahahsscboard.in या संकेत स्थळावर दि. १/१०/२०१८ ते २१/१०/२०१८ या कालावधीत भरावयाची होती. परंतु SARAL Database ने माहीती भरताना काही कनिष्ठ महाविद्यालयांना अडचणी येत असल्याचे निदर्शनास आले आहे. सबब सदर आवेदनपत्रे भरण्यास मुदतवाढ देण्यात येत असून सदर मुदतवाढीच्या तारखा खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आल्या आहेत.

| शुल्क प्रकार | उच्च माध्यमिक शाळा /कनिष्ठ महाविद्यालयामार्फत शास्त्र कला व वाणिज्य शाखांची फक्त **नियमीत** विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे SARAL Database वरुनऑनलाईन पध्दतीने भरावयाच्या तारखा | उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी बँकेत चलनाद्वारे शुल्क भरावयाच्या तारखा | उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी संबंधित वितरण केंद्राकडे चलनासह विद्यार्थ्यांच्या Excel याद्या जमा करावयाची तारीख |
|---|---|---|---|
| नियमित शुल्क | सोमवार,दि. २२/१०/२०१८ ते मंगळवार दि. ३०/१०/२०१८ | सोमवार दि.१२/११/२०१८ ते शनिवार दि.१७/११/२०१८ | सोमवार दि.१९/११/२०१८ |

** दि.०७/११/२०१८ ते १२/११/२०१८ या कालावधीत उच्च माध्यमिक शाळा/क.महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांच्या याद्या Excel मध्ये प्रिंट कराव्यात.

सदर परीक्षेची आवेदनपत्रे ही ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांनी आवेदनपत्रे त्यांच्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांमार्फत भरावी. सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्य यांनी ऑनलाईन आवेदनपत्रे भरण्यासाठी खालील बाबी विचारात घेणे आवश्यक आहे.

१. शासन आदेशानुसार उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी नियमीत विद्यार्थ्यांची शास्त्र,कला व वाणिज्य शाखांची ऑनलाईन आवेदनपत्र स्विकारण्यासाठी SARAL Database मध्ये विद्यार्थ्यांची नोंद आवश्यक आहे. सदर SARAL Data वरुनच नियमीत विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे भरावयाची आहेत.
२. विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे SARAL Database वर Save होत नसल्यास त्यांनी दि.२२/१०/२०१८ पासून उपरोक्त दिलेल्या मुदतीत All Application च्या Link वरुन आवेदनपत्रे भरावयाची आहेत.
३. उर्वरित इतर विद्यार्थ्यांच्या नियमित व विलंब शुल्काच्या यापूर्वी कळविलेल्या तारखांमध्ये व तपशीलामध्ये कोणताही बदल केलेला नाही याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.
४. सर्व विभागीय मंडळातील उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी प्रचलित शुल्क मंडळाने निश्चित केलेल्या बँकेच्या खात्यामध्ये जमा करुन चलनाची प्रत व विद्यार्थ्यांच्या याद्या दिलेल्या मुदतीतच संबंधित विभागीय मंडळाकडे सादर कराव्यात.
५. नियमित शुल्कासह तसेच विलंब शुल्कासह आवेदनपत्रे सादर केलेल्या विद्यार्थ्यांचे शुल्क दोन स्वतंत्र चलनाद्वारेच भरण्यात यावेत.

विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ कोल्हापूर